पुणे महानगर

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

**३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पिंपरी-चिंचवड, पुणे 411044**

३ rd floor, New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune - ४११०४४

Phone no. ०२०-२५९ ३३ ३३३ / ४४ / ५६ Email: comm.@pmrda.gov.in

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय**:- विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्र खर्चीची कार्यपध्दती सुधारित करणेबाबत...

**संदर्भ**:- १) विकास हक्क हस्तांतरण (टिडीआर) कार्यपध्दती (SOP) सुधारित कार्यपध्दती कार्यालयीन आदेश क्र. पीएमआरडीए/म.आ.क.वि.प.कार्यपध्दती/२५६५/२०२५, दि. २४/०६/२०२५

२) विकास परवानगी विभाग यांचेकडील कार्यालयीन आदेश जा.क्र. वि.प./विभागवार कामकाज वाटप/ २६१९, दि. २५/०६/२०२५

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील इमारत बांधकाम परवानगी प्रस्तावांवर BPMS प्रणालीव्दारे कार्यवाही करणेत येते. परंतु ज्या प्रस्तावामध्ये टीडीआर क्षेत्र प्रस्तावित केलेले आहे. अशा प्रस्तावावर मंजुर टीडीआर खर्चीकरणेबाबत BPMS प्रणालीव्दारे ऑनलाईन कार्यवाही करताना अडचणी निर्माण होत आहेत. सबब, टीडीआर खर्चीकरणेबाबतची कार्यपध्दतीमध्ये एकसुत्रता आणणेकामी पुढील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१) खर्ची करण्यात येणाऱ्या डीआरसीची BPMS प्रणालीमध्ये Admin Login व्दारे Data Entry करुन व आवश्यक ती छाननी फी भरले नंतर अर्जदार यांचेकडील ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारावे.

२) प्राप्त अर्जाची संबंधित सहायक महानगर नियोजनकार यांचेकडुन ऑफलाईन छाननी करुन छाननी अहवाल व मसुदा तसेच, डीआरसीची मुळ प्रत उप/सहमहानगर नियोजनकार व मा. संचालक तथा विभाग प्रमुख, विकास परवानगी विभाग यांचेमार्फत मंजुरीसाठी मा.महानगर आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावी. मान्यतेनंतर खर्ची प्रमाणपत्र, नोंद केलेल्या डीआरसीची छायाप्रत तसेच, BPMS Data Entry पत्रासह सह/उपमहानगर नियोजनकार यांचे स्वाक्षरीने निर्गमित करावे.

३) सदर मंजुर टीडीआर खर्ची व अनुज्ञेयता प्रमाणपत्र याची छायांकित प्रत तालुका निहाय संबंधित सहायक महानगर नियोजनकार यांचेकडे पाठवावी.

४) इमारत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव BPMS प्रणालीव्दारे सादर करताना अर्जदार यांनी मंजुर टीडीआर खर्ची व अनुज्ञेयता प्रमाणपत्र व अद्ययावत डीआरसीची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

५) तालुका निहाय संबंधित सहायक महानगर नियोजनकार यांनी प्राप्त प्रस्तावामधील इमारत बांधकाम नकाशा व कार्यालयाकडील मंजुर टीडीआर खर्ची अनुज्ञेयता प्रमाणपत्र तसेच डीआरसी यांची शहानिशा करुन प्राप्त प्रस्तावावर पुढील कार्यवाही करावी.

६) ज्या हस्तांतरणीय विकास हक्क (DRC) यांचा वापर पुर्णपणे होऊन नोंद झालेली आहे (FSI Credit निरंक), अशा DRC Owner Copy प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावी.

सदरचे आदेश आजपासुन लागु राहतील.

जा.क्र. टीडीआर खर्ची/कार्यपध्दती/ ३२६४/२०२५-२६

दि. २२/०७/२०२५

(डॉ. योगेश म्हसे)
**महानगर आयुक्त,**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.**

प्रत:-१) मा. महानगर आयुक्त यांचे स्विय सहायक

२) संचालक, तथा विभाग प्रमुख, विकास परवानगी विभाग,

३) सर्व संबंधित अधिकारी, विकास परवानगी विभाग